# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28 / 07 / 2022 (गुरूवार)

## चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा परसोडी शिवार येथे दि. २६/०७/२२ ते दि. २७/०७/२२ चे ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निखील प्रफुल धमदे, वय ३० वर्ष, रा. परसोडी ता. सावनेर यांचे शेत परसोडी शिवारात असुन शिवारातील शेतामध्ये टिनाचे शेड टाकले आहेत. त्यामध्ये ०२ रूम तयार केलेले असुन त्या शेडमध्ये फिर्यादी यांनी ठेवलेले शेती उपयोगी साहित्य ०१) भाजीपाला ठेवण्याचे प्लास्टीक कॅरेट ४० नग किंमती ४,०००/–रू., ०२) ०२ प्लास्टीक ड्रम किंमती ६,००/–रू., ०३) दोन नग लोखंडी एगल किंमती ५,००/–रू., ०४) १० फुट लोखंडी पाईप ०४ नग किंमती १,०००/–रू., ०५) पिवीसी प्लास्टिक पाईप किंमती २,५००/–रू. असा एकुण कि. ११,६००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने शेतातील टिनाचे शेड मधील रूमचे ताला तोडुन आत प्रवेश करून चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अमर झिने मो नं. ८१८०९७५१२५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील खदान नं. ३ कन्हान येथे फिर्यादी नामे– चंद्रकुमार हंसलाल वर्वे, वय ४० वर्ष, रा. शिवीगरी शाळेच्या मागे रामप्रकाश यांचा घरी किरायाने खदान नं. ०३ कन्हान यांच्या जवळ १२ बकऱ्या आहेत. फिर्यादी त्यांचे पालन पोषण करुन त्यांची विक्री करतात. दि. २६/०७/२२ चे २१.०० वा. ते २१.१५ वा. सुमारास फिर्यादी हे कामावरुन घरी आल्यावर फिर्यादीच्या पत्नीने सांगीतले की, मुलांनी बकऱ्या चरवुन आणल्यानंतर त्यांचा गोटा साफ करुन आत ठेवायला गेली असता तिथे काळया पांढऱ्या रंगाची बकरी दिसत नाही. त्यावरुन फिर्यादी आणि त्यांचे मुले हे बकरी शोधायला बाहेर गेले असता त्यांना बकरी मिळुन आली नाही. तेव्हा शेजारी राहणारा दिनेश राजपुत याने सांगीतले की, सांयकाळी ०७.३० वा सुमारास दोन अज्ञात इसमाने काळया पांढऱ्या रंगाची एक बकरी किमत अंदाजे ५,०००/–रू. ही मोटार सायकल वर बसवुन पांदण रोड ने घेवुन जातांना दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जैलाल सहारे मो.नं. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील हलदीराम कंपनी गुनथाळा येथे दि. २७/०७/२२ चे १८.३० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– जमदेश शमसुदीन अंसारी वय ४५ वर्ष, रा. पारशिवनी हा हलदीराम कंपनीत मध्ये गाडी चालविन्याचा काम करतो. फिर्यादी गाडी क्र एमएच–४०/ सीडी– ९१६७ अशोकलॅन्ड कंपनीची गाडी ही नेहमी कंपनीच्या गेट जवळ लावतो. फिर्यादीने गाडी गेट जवळ उभी करुन आंघोळ करण्याकरीता गेले व गाडीचा दरवाजा उघडाच ठेवला. फिर्यादीचा पॉकीट गाडीमध्ये राहीला होता त्यामध्ये २८,०००/–रु. होते. फिर्यादी हे आंगोळ करुन परत आले तेव्हा फिर्यादीचा पॉकीट अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक डोईफोड ९८२३३०१४७४ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील आष्टीकला शिवार येथे दि. २६/०७/२२ चे ००.०० वा. दि. २७/०७/२२ ते ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– नरेंद्र नारायण नेगे वय ४० वर्षे रा. आष्टीकला यांचे शेतातील गोठ्यात बांधून ठेवलेला फिर्यादीचा ०१ बैल तसेच त्यांचे काका यांचे फिर्यादीच्या शेतातील गोठ्याजवळ बांधून ठेवलेले २ गाय, १ कालवड, १ गोऱ्हा, तसेच आशीष डेहनकर यांचे सुध्दा बांधुन ठेवलेली १ गाय दोरासहीत एकुण ०३ गाय, ०१ बैल, ०१ कालवड, १ गोऱ्हा एकुण किमती ३५,०००/–रु. चे जनावरे चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी हिवरकर मो.नं. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

**५) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील पेंच पाटबंधारे उपविभाग रामटेक येथे दि. ०४/०७/२२ चे १३.३० वा. दि. २५/०७/२२ ते १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलेश रमेश बुजाडे (आस्थापना लिपीक) पेंच पाटबंधारे उपविभाग रामटेक वय २८ वर्ष रा. सावनेर यांचे पेंच पाटबंधारे उपविभागाच्या गोडावुन मध्ये ठेवलेले 1) crass staff with stand-13 नग किमती ५,५००/–रू., 2) Dumpy level 39 नग किमती /–रू., 3) Instrument box-7 नग किमती १०००/–रू., 4) Measuring chain-6 नग किमती १,०००/–रू., 5) magniting glass- 2 नग किमती २००/–रू., 6) Optical Squar- 5 नग किमती ३,००/–रू., 7) Prismatic compos-20 नग किमती ३,०००/–रू., 8) compos Stand-8 नग किमती ७,००/–रू., 9) Parrellal Rullar -14 नग किमती ५,००/–रू., 10) Plani Meter-3 नग किमती १,५००/–रू., ११) Pentagraph24- 5 नग किमती १,२००/–रू., 12) pentagraph 36- 1 नग किमती ५,००/–रू., 13) Renging Rod - 2 नग किमती २,००/–रू., 14) theodolie with stand 2 नग ३,०००/–रू., 15) water level indicatore 1 नग किमत १,००/–रू., 16) wooden divider -7 नग किंमत ३००/–रू., १७) battery big size – 2 नग किमंत १०००/रू १८) battery small size -5 नग किंमत ५००/–रू. असा एकुण कि. ५०,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८०, ४६१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक यागेश भुरे मो.न. ९८२२५६६१८० हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील नगरधन ते कन्हान रोडववरील पेट्रोलपंपच्या समोर रामटेक येथे दि. २३/०७/२२ चे २१.०० वा. ते २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सचिन कवडुजी दुधपचारे, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. साटक रामटेक यांची एमएच–३१/केआर–२०५ क्रमांकाची काळया रंगाची सुपर स्प्लेंडर मोटरसायकल ही नगरधन ते कन्हान रोडने साईडला थांबवुन ते शौचास गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. १५,०००/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो.नं. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. कुही:– दिनांक २८/०४/२०२२ ते दिनांक २६/०७/२०२२ चे २१:३० वा. ते २२.०० वा. चे सुमारास वय १७ वर्ष फिर्यादी/पीडिता हिला आरोपी नामे– दिपक विष्णु मसराम, वय १९ वर्षे, रा. पाचगाव, ता. उमरेड, जि. नागपुर याने लग्नाचे आमीश दाखवुन तिचे सोबत शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. सदर पीडिता हि गर्भवती राहीली. आरोपीने तिला गर्भपाताच्या गोळ्या आणुन खाण्यास सांगीतले तेव्हा पासुन तिची प्रकृती खराब होती. ती तिच्या मावशी कडे असता तिला त्रास होत असल्याने तिला गोंदीया येथील रूग्णालय येथे उपचारकामी भरती केले असता पीडितेच्या बयाणावरून व मेडीकल रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोंदीया शहर येथे गुन्हा नोंद करून सदरचा गुन्हा सीसीटीएनएस दवारे ट्रान्सफर केल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३१३, ३७६ भादंवि. सहकलम ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा मसपोनि सुचिता मंडवले मो.क्र. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा तारसा दिनांक २३/०७/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान **प्रतिक विनोद मेश्राम (मृतक), वय २८ वर्ष रा. धनी ता. मौदा** हा दि. २३/०७/२२ रोजी सकाळी ०९.०० दरम्यान डयुटीला जाण्याकरीता घरुन निघाला १०.०० वा. सुमारास लहरीबाबाच्या मंदीराच्या बाजुला तारसा शिवारात कुठल्यातरी अज्ञातकारणा वरुन विशारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकरीता प्रथम सरकारी दवाखाना तारसा व नंतर नागपूर मेडीकल कॉलेज येथे दि २३/०७/२२ चे १४.०९ वा. भरती केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासून दि. २३/०७/२२ चे १६.०० वा मृत घोषित केले. मेडीकल पोलीस बुथ येथून कागदपत्रे प्राप्त झाल्याने दि २७/०७/२२ रोजी मर्ग दाखल करण्यात आले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला :–** अंतर्गत बेला येथे दिनांक २७/०७/२०२२ चे १५.०० वा. पूर्वी **सौ भिमा उध्दव बावणे (मृतक), वय ५२ वर्षे रा. बेला** हिचे छातीत दुखत असल्याने तिला उपचाराकामी पिएचसी बेला येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन गोपाल धनकासार, वय ४६ वर्ष, रा. बेला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सपाटे मो.क्र. ९१६८०६२६१८ हे करीत आहे.

पोउपनि श्री भारत थिटे
मो.क्र. ७८८८०१६९४५
पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर